# जननी



सविता शेट्टी

# जननी

(कथासंग्रह)

## सविता वाळिंबे-शेट्टी

ई साहित्य प्रतिष्ठान

## जननी (कथासंग्रह)

सविता वाळिंबे-शेट्टी,

एस्-1/35, जय कृष्णसुदामा सोसायटी,

बांगुर नगर, गोरेगांव (प.), मुंबई 400104.

मोबाईल नंबरः 98200 19448

ब्लॉग्जः 1. https://shabd-gof.blogspot.in/

2. https://thereflectionssite.wordpress.com/

3. https://fascinatingworld2016.wordpress.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com

www.esahity.com

Published : 14 November 2017

©esahity Pratishthan® 2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे  पुनर्मुद्रण किंवा एकांकिका, नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# जननी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटं

१ मिनिट : हे पुस्तक तुम्हाला कसे वाटले ते लेखिकेला कळवा.

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेलकरून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

# लेखिकेचं मनोगत



'मातृत्व' या एका भावनेचे अनेकविध पैलू दिसून येतात. या मातृत्वाच्या वेगवेगळ्या अंगांचा शोध घेऊ गेलं तर ते विवध रूपात आपल्यासमोर येऊन उभं ठाकतं. प्रत्येक मातेची, प्रत्येक स्त्रीची आपली एक अनोखी कथा असू शकते. अश्या या मातृत्वाच्या निराळ्या छटा मी काही कथांमधून साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी तीन कथा येथे "जननी" या ई पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित होत आहेत.

या माझ्या कथा पुस्तकरूपाने वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ई साहित्य प्रतिष्ठानने केले त्याबद्दल मी संपूर्ण ई साहित्य टीमची अत्यंत आभारी आहे.

कथा वाचून त्या कश्या वाटल्या, आपले त्याविषयी काय विचार आहेत ते अवश्य कळवावे. आपल्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.

माझे सर्व आयुष्य मुंबईतच गेले. बालपणापासून वाचनाची अतिशय आवड होती, आहे. कितीदा वाचले तरी सदैव ताजे वाटते असे पु.ल.देशपांडे यांचे लेखन खूप आवडते. त्याच प्रमाणे व.पु.काळे, विजय तेंडूलकर, जयवंत दळवी, विजया राजाध्यक्ष, डॉ.विजया वाड, इंद्रायणी सावकार अश्या अनेक लेखक

लेखिकांचे मराठी साहित्य वाचण्यात रुचि आहे. (इंग्रजीत आर्थर हॅले, सिडने शेल्डन, अॅलिस्टर मॅक्लिन वगैरेंचे लेखन आवडते).

मला लहानपणापासूनच मनातल्या मनात गोष्टी गुंफण्याचा छंद होता. पण प्रत्यक्षात साधारण 1990 पासून मासिकांमध्ये प्रकाशनासाठी पाठविण्यास सुरूवात केली. प्रथम लहान मुलांच्या बऱ्याच गोष्टी तसेच मुलांच्या कथा-कादंबऱ्या व माहितीपूर्ण पुस्तके (इंग्रजीतून) प्रकाशित झाली. त्याबरोबरच स्त्री-जीवनाविषयी भावनाप्रधान तसेच विनोदी ढंगाच्या कथाही विवध मराठी मासिकांतून व दिवाळी अंकांतून प्रकाशित झाल्या. 'नाते' ही कादंबरी 2008मध्ये प्रकाशित झाली.

सध्या भाषांतराची कामे (ऑनलाईन) करते. निरनिराळ्या विषयांवर ब्लॉग्ज् ही लिहिते.

आपली नम्र

सविता वाळिंबे-शेट्टी,

एस्-1/35, जय कृष्णसुदामा सोसायटी,

बांगुर नगर, गोरेगांव (प.), मुंबई 400104.

मोबाईल नंबरः 98200 19448

ब्लॉग्जः 1. https://shabd-gof.blogspot.in/

2. https://thereflectionssite.wordpress.com/

3. https://fascinatingworld2016.wordpress.com/



हे ई पुस्तक

लेखनाची क्षमता दिली

त्या बुद्धीच्या देवतेला,

श्री गजाननाला

आदरपूर्वक अर्पण.

--सविता वाळिंबे-शेट्टी

# कथानुक्रम


जावे तिच्या वंशा -------

जाणीव

अन्याय

# जावे तिच्या वंशा -------

"नंदिनी!" पपांची हाक ऐकून नंदिनी बाहेर आली. पण विचारायची गरज नव्हती, तिला ठाऊक होते. "अगं नंदिनी, जाऊन येतेस ना? आज रविवार, विसरलीस का?" पपांनी विचारले.

"नाही पपा, पण ..." नंदिनी घुटमळली, "मम्मीला मदत करायची आहे ....आज निखिलचा वाढदिवस ना?"

"अगं पण असा कितीसा वेळ लागतो? ड्रायव्हर तुला नेऊन आणेल, मीच आलो असतो पण मला एकाकडे जायचं आहे. जा, जाऊन ये. तशी तर तू तिथे फारशी थांबतही नाहीस. तेवढा वेळ मम्मी करेल एकटी तयारी...."

नंदिनी काहीच बोलत नाही हे पाहून पपा पुन्हा आर्जवाने म्हणाले, "तू नेहमी अशी टाळाटाळ का करतेस पोरी? का नाही जात? जा, तेवढंच तिला बरं वाटतं. मी तर वरचेवर जातच असतो, पण तिचा जीव अडकलाय तो तुझ्यात. तुझ्या येण्याकडे डोळे लावून बसली असते..."

"असं तुम्ही म्हणता पपा," नंदिनी जरा वैतागूनच म्हणाली, "पण मी गेल्याचं तिला कळत देखील असेल का नाही कोण जाणे! मला नाही वाटत की तिच्या आजूबाजूला जे होतं ते तिला समजत असेल...."

"असं नको म्हणूस ग," पपा एकदम दुखावून म्हणाले, "अगं, तिला सगळं समजतं. ती बोलून सांगू शकत नाही म्हणजे तिला काही समजत नाही असं नव्हे. तू कधी तिची भाषा, तिचे भाव समजून घ्यायचा प्रयत्नच करत नाहीस. शिक्षा केल्यासारखी तिच्यासमोर पंधरा मिनिटं बसून पळून येतेस. अगं जरा तिच्या मनाचा विचार कर. तिला कधी फारसं सुख मिळालं नाही, आता काहीही देऊन त्याचा उपयोग नाही. आपल्या माणसांना भेटणे एवढंच काय ते तिचं सुख, नि तेवढ्यासाठीही तू कंटाळा करतेस?"

पपांसारखा एवढा मोठा पुरूष एकदम असा भावूक होऊन बोलायला लागला म्हणजे नंदिनीला कसेतरीच अवघडल्यासारखे वाटे. पण या विषयावर पपा नेहमीच हळवे होत. तिचीच चूक होती, आधीच टाळाटाळ न करता ती जाऊन आली असती तर बोलणे निघण्याचा प्रश्नच नव्हता. आता ठेवा तयारी पूर्ण भाषण ऐकण्याची. नंदिनीने मनातल्या मनात कपाळाला हात लावला.

"त्यावेळी हा बंगला, वैभव हे काही नव्हतं. मोठ्या एकत्र कुटुंबात राहायचो...." पपा भूतकाळात हरवून गेले होते. "मी दिवसरात्र बिझनेस उभा करण्याच्या खटपटीत. एवढ्या मोठ्या सासरच्या खटल्यात तिची काय स्थिती होत होती हे पाहाण्याकरतादेखील मी कधी फुरसत काढली नाही. एवढ्या तरूण वयातही ब्लड प्रेशर होतं की काय कोण जाणे? नेहमी डोकं दुखण्याच्या तक्रारी सांगे नि मी दुर्लक्ष करी. जेव्हा तो अर्धांगवायूचा झटका आला तेव्हा फार उशीर झाला

होता. सर्व उपाय केले, पण...." पपांनी विफलपणे हात हलवले, "तुला नाही आठवायचे .... तू अगदी लहान होतीस, जेमतेम वर्षा - दोन वर्षांची...."

नंदिनीने प्रयासाने जांभई दाबली. तिला खरंच काही आठवत नव्हते. पण पपांचे हे लेक्चर वरचेवर ऐकून सर्व घटना मात्र अगदी तोंडपाठ होत्या. तिला नेहमी वाटे कि पुन्हा पुन्हा तेच तेच सांगून पपा त्यांची अपराधीपणाची भावना कमी करण्याचा प्रयत्न करत असावेत. पण ज्यात आपली चूक नाही त्याबद्दल अपराधी का वाटून घ्यायचं?

"तू लहान होतीस तोपर्यंत मीच तुला घेऊन जायचो. आता मोठी झालीस नि जायचा कंटाळा करायला लागलीस. तुला आवडत नाही, पण सर्वच आपल्या आवडीप्रमाणे होत नाही. दुसऱ्याच्या मनाचा विचार करून कधी आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवायला लागतात ...." पपांनी समजावले.

पण कंटाळा आला तरीही ती जात होतीच ना? आवडत नसले तरी ती आपले कर्तव्य करीतच होती. पण त्यापुढे जाऊन अपंगाश्रमातल्या त्या खाटेवरच्या सजीव गोळ्याला 'आई' मानायला मात्र तिचे मन कधीच तयार नव्हते. तिच्यासाठी मम्मी हीच तिची आई होती. पपांनी वरचेवर सांगूनही त्या बाईला आई मानायला तिचं मन तयार नव्हतं. तिला बाई तरी कसे म्हणायचे? श्वास चालू होता म्हणून जिवंत आहे म्हणायचे --- नाहीतर ते न हलणारे अवयव, अर्ध-मिटलेले डोळे, बोलायचा प्रयत्न केला की घश्यातून निघणारे विचित्र आवाज, ती ओठाच्या कोपऱ्यात जमलेली लाळ ---- आठवणीनेच नंदिनीला शिसारी आली.

तिला तिच्या मनाने टोकले ---कोणाविषयीही असे विचार करू नयेत, आता कशीही असली तरी तिची जन्मदात्री होती ती. पण नंदिनीला जिची एकही गोष्ट आठवत नव्हती तिच्याबद्दल मनात माया कशी असावी? निव्वळ सर्वांनी सांगितलं कि ही तुझी आई आहे, म्हणून? जन्म कोणी का दिला असेना, तिच्या मते मम्मीच तिची आई होती.

जेव्हापासून आठवत होते तेव्हापासून ती मम्मीच्याच कुशीत वाढली होती. सावत्र असूनही मम्मीने तिच्यात व स्वतःच्या मुलात कधी भेदभाव केला नव्हता. ती मम्मीची मुलगी नाही असे नंदिनीला कधी जाणवले नव्हते. मग केवळ त्या स्त्रीने जन्म दिला म्हणून तिच्याबद्दल प्रेम किंवा हळहळ कशी वाटावी? जिच्याशी कधीच संबंध आला नाही ती नंदिनीला नेहमीच त्रयस्थ, परकी स्त्री वाटायची. तिच्याबद्दल आपुलकी वाटत नसतांनाही तसा आव आणणे हा नंदिनीला शुद्ध ढोंगीपणा वाटत होता. पण आता पपांच्या समाधानासाठी ती निमूटपणे गेलीच.

नंदिनीची शेवटच्या वर्षांची परीक्षा संपली. पुढे अजून शिकायचं का नोकरी करायची असा तिचा विचार चाललाच होता, पण पपा-मम्मीच्या मनात वेगळेच दिसत होते. ह्याला भेट, त्याला विचार असे करत नंदिनीसाठी नवरामुलगा शोधण्याची तयारी जोरात चालली होती. नंदिनीचीही तशी फारशी हरकत नव्हती.

पसंती-नापसंती पाहात, होय-नाही म्हणता म्हणता नंदिनीचे लग्न ठरले. देवदत्त दिसायला साधारण पण कर्तबगार आणि हुशार तरूण होता. नंदिनी खुशीत होती. साखरपुडा होऊन लग्न ठरल्याचे शिक्कामोर्तबही झाले.

साखरपुडा झाल्यानंतर पपांनी तिला बळेच देवसह अपंगाश्रमात पाठवले….. तिची इच्छा नसतांनाही. तिला विचित्र वाटत होते. तिथे नेहमी जाऊन, ते वातावरण परिचित असूनही प्रत्येक वेळी नंदिनीला शिसारी येई, थोडी किळस वाटे. अश्या ठिकाणी देवला घेऊन जायचे म्हणजे……त्याला कसं वाटेल?

पण देवला मनातून काही वाटले असो वा नसो, त्याने वरकरणी काहीच दर्शविले नाही. तिची आई देवदत्तचा हात आपल्या एका अधू हातात धरून पाणावलेल्या नजरेने त्याच्याकडे पाहात राहिली. देवही त्या वयस्क रुग्ण-स्त्रीचा हात आपल्या हातात धरून काही न बोलता शांत बसला होता. पण इथे नंदिनीलाच कसेसे होत होते.

शेवटी कशीबशी सुटका करून घेऊन नंदिनी देवसह बाहर पडली. त्याला एकूण ही भेट कशी वाटली हे विचारण्याचे धाडस ती करू शकली नाही. काही झाले तरी तिच्यासाठी तो अजूनही नवखा होता.

लग्नाची तयारी करता करता दिवस कसे भुर्रकन् उडाले ते कळले देखील नाही आणि म्हणता म्हणता नंदिनीचे लग्न मोठ्या थाटामाटात पार पडले. लग्नासाठी आईला अपंगाश्रमातून घरी घेऊन येण्याचा पपांचा विचार होता. पण लग्नाच्या गडबडीत तिची कितपत सोय पाहता येईल ह्या शंकेने त्यांनी तो विचार रद्द केला आणि नंदिनीने मनातल्या मनात निःश्वास टाकला.

पण लग्नसोहळ्यानंतर मात्र पपांनी तिला टाळाटाळ करायला संधीच दिली नाही. सासरी जायला उशीर झाला तर ते लोकं काय म्हणतील ही सबब तिने पुढे केली, पण पपांनी लगेच उत्तर दिले, "त्यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. त्या सर्वांनाही हेच वाटते की प्रथम तिथे गेलेच पाहिजे." तेव्हा नंदिनीचे बोलणेच खुंटले.

पुन्हा साखरपुड्याच्या भेटीची पुनरावृत्ती. परंतु या खेपेस मात्र तिला आईच्यात अधिकच चलबिचल जाणवली. कधी नव्हे ते त्या थिजलेल्या नजरेत काही चमक दिसत होती. याचा अर्थ तिला आनंद झाला आहे असा होता का? थरथरत्या हाताने ती त्या दोघांना वारंवार कुरवाळत राहिली. नंदिनीला देवचे नवल वाटत होते. आपलीच आई असल्याने ती गप्प राहिली, पण त्याची तर ती कोणीच नव्हती. मग तो कशाला सर्व सहन करत होता? त्याला कसेतरीच नाही होत? पण देव तिच्याशी या विषयावर कधी बोलला नाही आणि तिनेही तो नावडता विषय कधी काढला नाही.

हनीमून झाला; नव्याची नवलाई हळूहळू मावळली आणि नंदिनी आपल्या नवीन संसारात रूळून गेली. नवीन आचार-विचार, नवीन पध्दती शिकण्यात दिवसांचे आठवडे आणि आठवड्यांचे महिने कधी झाले ते नंदिनीला कळले देखील नाही.

दुधात साखर पडावी तशी हलकेच तिला येणाऱ्या नवीन पाहुण्याची चाहुल लागली. मग तर नंदिनीला कशातच काही उणे राहिले नाही. फक्त नंदिनी आणि देवदत्तच नव्हे तर दोन्ही घरची मंडळी बाळराजाची अगदी आनंदाने आणि

आतुरतेने वाट पाहात होती. आंबटगोडाचे लाडकोड झाले, कौतुकाची डोहाळेजेवणे झाली आणि पेढ्यांच्या खैरातीत छोट्या बाळराजांचे आगमन झाले.

आता नंदिनी आणखीनच आपल्या संसारात गुरफटून गेली. घरची कामे, छोट्याच्या लहरी आणि देवदत्तच्या आवडीनिवडी पाहता पाहता तिला इथेतिथे बघायलाही फुरसत होत नव्हती. अर्थात त्याबद्दल तिची काहीच तक्रार नव्हती. सर्व दिवसाचा शीण त्या छोट्याच्या बाळलीला बघतांना उडून जात असे. आणि त्यात पुन्हा देवचे प्रेमाचे दोन शब्द ऐकले म्हणजे सर्व दिवसच सार्थकी लागत असे.

त्याच सुमारास नंदिनीच्या तब्येतीच्या बारीक सारीक तक्रारी सुरू झाल्या. कधी चक्कर आल्यासारखे वाटे तर कधी डोळयापुढे अंधारी येई. बाळंतपणानंतरचा अशक्तपणा या नावाखाली तिने दुर्लक्ष केले. पण त्या तक्रारी काही कमी झाल्या नाहीत. तेव्हा देवने तिच्या मदतीला एक कामवाली ठेवली, टेबलावर टॉनिकच्या बाटल्यांची रांग लावली. इतके करूनही काहीच फरक पडला नाही.

शेवटी डॉक्टरकडे जाणे हे आलेच. त्यांनीही तात्काळ काही अनुमान दिले नाही. तेव्हा मग एक्स रे, रक्त तपासणी, ही टेस्ट ती टेस्ट. हे सर्व करता करता नंदिनीच्या मनात शंका डोकावू लागली. आपला आजार हा साधा अशक्तपणा किंवा त्यातून निघालेला काही सामान्य रोग दिसत नाही. पण तिला विचारायची ही भीती वाटत होती. जे नको तेच उत्तर पुढे आले तर? ती शक्यतो ह्या सर्व टेस्ट,

त्यांचे निकाल यांचा विचार मनातून काढून टाकायचा प्रयत्न करी. मुलाच्या कामात, त्याच्याशी खेळण्यात मन गुंतवण्याचा प्रयत्न करत राही.

पण डॉक्टरांकडच्या वारंवारच्या खेपांमध्ये हळूच गाठ, ऑप्रेशन हे शब्द डोकावू लागले, तेव्हा तिने न राहावून देवदत्तला विचारलेच. "अगं, तसं घाबरण्यासारखं काहीच नाहीये," या शब्दांनी तिची भीती अजूनच वाढली. "तुझ्या मेंदूवर जराशी गाठ किंवा वाढ दिसतेय. ती ऑप्रेशनने काढून टाकायची असं डॉक्टर म्हणत होते. ते काही फारसं धोक्याचं नाहीये म्हणे.." देव तिला नि स्वतःलाच धीर देत म्हणाला.

नंदिनी पुन्हा त्या सर्व गोष्टींचा विचार मनातून काढून टाकण्याच्या प्रयत्नास लागली. जे व्हायचे ते होईल, आपण आत्तापासून चिंता केल्याने काही वेगळे थोडीच होणार आहे? छोट्यात मात्र आता तिचा जीव जास्त जास्तच अडकू लागला. जणू काही त्याला तिच्यापासून कोणी हिरावूनच घेणार होते. डॉक्टरांनी तिला वरचेवर आश्वासन दिले होते कि हे तसे अगदी गंभीर ऑप्रेशन नाही, पण तरीही मेंदूची शस्त्रक्रिया म्हंटल्यावर भीती ही वाटणारच.

बाळाला ओल्या डोळयांनी मम्मीच्या हाती सुपुर्द करून नंदिनी हॉस्पिटलात दाखल झाली. तिथे जाऊन पुन्हा सर्व तपासण्यांची फेरी झाली. नंदिनी मात्र या सर्वांतून अगदी यांत्रिकपणे जात होती. तिचे सारे लक्ष तिच्या पिलातच गुंतले होते. मम्मी रोज सकाळ संध्याकाळ त्याला घेऊन येईच, तरीसुध्दा नंदिनीला ते कमीच वाटे.

म्हणता म्हणता ऑप्रेशनचा दिवस उजाडला. नंदिनीचा सर्व केशसंभार उतरला, तिच्या हाताला तो स्पर्श काही विचित्रच वाटला. पण तिच्या मनापर्यंत त्याची नोंद पोहोचली नाही. तिचे मन मुलाच्या विचारातच गुंतले होते, त्यातून बाहेर येऊ इच्छित नव्हते.

आता आपल्याला गुंगीचं औषध देतील, मग ऑप्रेशन होईल. पण त्यानंतर मी डोळे उघडीन तेव्हा अशीच असेन का? काही झाले तरी मेंदूसारख्या नाजूक व महत्त्वाच्या अवयवाचे ऑप्रेशन. तिथेच सर्व संवेदनांची केंद्रे असतात ना? मग ती गाठ काढतांना असे एखादे संवेदना केंद्रच नष्ट झाले वा त्याला धक्का लागला, तर?

गुंगी उतरल्यावर मी डोळे उघडीन आणि मला कदाचित दिसणारच नाही! म्हणजे? मग मी बाळाला पुन्हा कधीच पाहू शकणार नाही? आणि समजा, मी ऐकण्या-बोलण्याची शक्तीच गमावून बसले तर? बाळाला आई म्हणायला कसे शिकवणार मग? नि त्याचे बोबडे बोल मी ऐकू शकेन का? नंदिनीच्या मनात अधिकाधिक भीती दाटू लागली.

आणि समजा .... समजा, माझ्या हातापायातील शक्तीच गेली तर? मी काहीच करू शकणार नाही. जन्मभर दुसऱ्यावर विसंबून राहावे लागेल. बाळाला खेळवू शकणार नाही, घरभर चिऊ-काऊ दाखवून घास भरवू शकणार नाही. एका कोपऱ्यात पडून राहून दिवस काढावे लागतील. नंदिनीच्या अंगावर सरसरून काटा आला, कारण तिच्या मनातले ते चित्र तिच्या नेहमीच्या परिचयातले होते, अगदी परिचयातले होते ...... तिची आई.

काही हवे नको का पाहायला देव आत आला आणि नंदिनीचा बावरलेला चेहरा पाहून धीर देण्याच्या उद्देशाने म्हणाला, "आता घाबरायचं वगैरे काही नाही हं, बाईसाहेब."

नंदिनी मान हलवत म्हणाली, "पपा बाहेर असतील तर त्यांना जरा बोलावता का?" देवदत्तने पपांना बोलावून आणले. ते ही तिला धीर देण्याचा प्रयत्न करू लागले. पण तो विषय बाजूला सारीत नंदिनी म्हणाली, "पपा, समजा मी ह्या ऑप्रेशनमधून पूर्ण बरी झाले ....."

"अगं, समजा काय, तू पूर्ण बरी होणारच....." पपा ठामपणे म्हणाले. तोवर मम्मी ही येऊन उभी राहिली.

"ऐका नं पपा, मी बरी झाले तर ..... तर मला आधी आईकडे घेऊन जाल?" नंदिनीने विचारले. पपांनी गोंधळून बाजूलाच उभ्या असलेल्या मम्मीकडे पाहिले. मम्मी तर इथेच आहे, मग नंदिनी तिच्याकडे घेऊन जायचं का बोलत होती? त्यांचा गोंधळ लक्षात येऊन नंदिनी कसंनुसं हसली.

"नाही नाही पपा, आईकडे ...... म्हणजे तिथे .....अपंगाश्रमात."

पपांनी चमकून नंदिनीकडे पाहिले आणि मग सर्व उमजून हळूच तिचा हात थोपटला.

# जाणीव

"मॅडम, कुणी भेटायला आलंय," केबिनचे दार उघडत शिपायाने सांगितले. तोपर्यंत एक उंचसा तरूण त्याच्यापाठी येऊन उभाही राहिला होता. मधुरा किंचित गडबडली, पण लगेच स्वतःला सावरत त्याला म्हणाली, "बरं, दे आत पाठवून," शिपाई निघून गेला.

तो तरूण आत येऊन तिच्यासमोर उभा राहिला. बऱ्याच वर्षांत तिने इतक्या जवळून त्याला पाहिले नव्हते, पण .... तो जयूच होता; हो नक्कीच. तो असा अचानक आणि ते सुध्दा तिच्या ऑफिसात येईल असे तिला वाटले नव्हते. तिच्या केबिनच्या अर्ध्या काचांतून बाहेरचे स्टाफमधले काहीश्या कुतुहलाने तिच्या दिशेने बघितल्या न बघितल्यासारखे करत असल्याचे तिला डोळयाच्या कोपऱ्यातून जाणवले. आलेला तरूण कंपनीच्या ऑफिशियल कामांसाठी तिच्याकडे येणाऱ्यापैकी नक्कीच दिसत नव्हता. टी-शर्ट, जीन्स, खांद्यावर बॅकपॅक – मॅडमकडे हा कोण आला याचं साहाजिकच सर्वांना आश्चर्य वाटत असावं.

जयूने उभ्या जागीच चुळबूळ करताच मधुरा काहीशी भानावर आली. "जयू?" तिने अंधारात चाचपडल्यासारखे विचारले. आणि त्याच्या उत्तराची वाट न बघता म्हणाली, "अरे, उभा का? बस ना ....कसा काय आलास?"

"म्हणजे? सीमाआत्याने सांगितले कि बोलावलय – म्हणून तर आलो," काहीसा गोंधळून, काहीसा चिडून तो उत्तरला.

"हो ....अरे, बोलायच होतं काही," एकदमच कुठे विषयाला हात घालणार असा विचार करत ती म्हणाली, "जेवण झालंय का तुझं? काही घेणार का – ज्यूस वगैरे?"

"काय काम होतं?" तो सरळ मुद्द्यावर येत म्हणाला, पण तोवर निदान समोरच्या खुर्चीत बसला तरी .... त्याने इतर काही अवांतर बोलायची इतकी नापसंती दाखविल्यावर मधुराचा नाईलाज झाला. त्यांच्यात इतर काही कॉमन विषयही नव्हता....काहीश्या अस्वस्थपणे बोटात पेन फिरवत ती म्हणाली, "तू ....तुझा पुढच्या शिक्षणासाठी परदेशी वगैरे जाण्याचा विचार आहे का? असं काही ठरवलयस....?" त्याच्या उंचावलेल्या भुवया पाहून गडबडीने पुढे म्हणाली, "नाही, म्हणजे .....सीमा असं काहीसं म्हणत होती ....."

"नाही, असं काही ठरवलेलं तर नाहीए ......पण का विचारलं?" तो अगदी रूक्ष कोरडेपणाने बोलला.

"नाही, तसं.... म्हणजे...." मधुरा गडबडली, तिचं तिलाच आश्चर्य बाटलं कि मोठमोठ्या बिझनेस मीटिंग्ज सहजतेने हाताळणारी मधुरा हीच का? एका मुलाशी बोलण्यात ती इतकी गडबडून जात होती? "अं...सीमा म्हणाली कि शिक्षणासाठी अमेरिकेला जायचा प्रयत्न ....अं .....तुझा विचार आहे. त्यामध्ये

बऱ्याच गोष्टी येतात ना....? तर.... काहीही, कसलीही गरज असेल, काहीही लागलं सवरलं तर ....तर मी आहे. म्हणजे ...मी करेन हवी ती मदत...."

तो अजिबात हलला नाही, पण जागच्या जागी ताठरल्यासारखा वाटला. "त्याची काही गरज नाही," तो एकदम उठून उभा राहात म्हणाला, "मुळात जायचा विचारही करीन का नाही ती ही शंकाच आहे ......."

तो आपली बॅग उचलून केबिनबाहेर पडलादेखील. मधुरा त्याच्यापाठी बघतच राहिली. आला केव्हा, गेला केव्हा ....विचारपूस करणं दूरच, साधं 'येतो' एवढंही म्हणाला नाही. तिच्या डोळयात पाणी तरारलं.

पण ती ऑफिसात होती हे तिला विसरून चालण्यासारखं नव्हतं. आधीच आजूबाजूच्या सर्वांना उत्सुकता होती आणि ते तिच्याकडेच बघत होते. काहीच झाले नाही असे भासवत तिने समोरच्या स्क्रीनमध्ये डोके खुपसले.

संध्याकाळी घरी परतल्यावर तिला तिचा आलिशान फ्लॅट आणिकच रिकामा रिकामा वाटू लागला. नेहमीच तर ती इथे एकटीच राहायची, आजच काय वेगळं होतं कि घर ओकंबोकं वाटावं? सीमाला फोन करावा का? तिच्याशी थोडं बोलता तरी आलं असतं – पण ती ही आताच ऑफिसातून परतून आपल्या घरकामात गुंतली असणार. सगळयांनाच आपापले संसार, मुलंबाळं, त्यांची कामं असतात; तिच्यासारखं कुणी एकटे, रिकामटेकडे थोडीच असतात?

मधुराने भावविवश न होता विचार करण्याचा निश्चय केला. पण विचार करणार कसला? आज जयू भेटला ......इतक्या वर्षांनी! ओळखू न येण्याइतका

मोठा झाला होता – पण एका शब्दानं विचारलं नव्हत कि आई तू कशी आहेस? अर्थात, तिनेदेखील कुठे विचारलं होतं? पण त्याने तिला बोलायची संधीही दिली नव्हती. तिला तर खूप खूप विचारायचं होतं, बोलायचं होतं. त्याची उमलती वर्षे तर ती जवळून पाहू शकली नव्हती, निदान त्याची भविष्याची स्वप्ने तरी जाणून घ्यायची होती, ती स्वप्ने साकार करण्यास त्याला मदत करायची होती. ती तश्या पोझिशनमध्ये होती.....

तिच्या रामाने जर आज आभाळीचा चंद्र मागायचा जरी हट्ट केला असता, तर निदान त्या चंद्रापर्यंत त्याला पोहोचविण्याचा ती पूरेपूर प्रयत्न करू शकली असती. आज तिची तेवढी क्षमता होती.

पण इथे उलटच होत होतं. ती मदत करणार अशी शंकाही येताच, तिचा राम आपला चंद्राचा हट्टच सोडून देईल कि काय अशी भीती निर्माण झाली होती. शिक्षणासाठी परदेशी तर त्याला नक्कीच जायचं होतं, सीमाने तसं स्पष्टच सांगितलं होतं तिला. आणि त्याने म्हणे त्या दृष्टीने तयारीही सुरू केली होती. पण तिने बोलावून मदत देऊ करताच त्याने तो विचारच सोडून देण्याची भाषा केली. आणि झालंही तसंच.

मधुराने दोन तीन दिवस वाट पाहिली की सीमा स्वतःच फोन करून तिच्या भेटीनंतर काय घडलं ते सांगेल. पण जेव्हा तिचा फोन आलाच नाही तेव्हा मधुराने तिला लंचसाठी बोलावून घेतलं. त्या दोघींची ऑफिसेस तशी जवळपासच होती आणि सीमाला त्रास पडू नये म्हणून मधुरा कार घेऊन सीमाच्या ऑफिसच्या जवळच्याच रेस्तराँमध्ये लंचसाठी गेली.

सीमा काहीशी अस्वस्थ, अवघडून बोलत होती. तशी ती अगदी पूर्वीसारखी मनमोकळी परत कधी झालीच नव्हती. मधुरा समीरपासून वेगळी झाल्यानंतर काही महिने तर सीमाने बोलणं काय ओळख दाखवणंही सोडलच होतं. नंतर हळूहळू अवघडत, अडखळत पुन्हा भेटणं बोलणं सुरू झालं होतं. मधुराला तिच्याकडूनच समीर, विशेषतः जयची खबरबात मिळत होती. सीमामार्फत, सीमाच्याच नावाने ती जयला थोड्याफार भेटवस्तू पाठवू शकत होती.

आजही भेटल्यावर सीमा सांगावं कि नाही अश्या गोंधळात म्हणाली, "मला वाटतं त्याने विचारच सोडला परदेशी जाण्याचा.... इथंच काही पोस्टग्रॅज्युएशन करीन म्हणतोय."

"का? मी मदत करते म्हणाले म्हणून?" मधुराने पुढ्यातले अन्न काट्याने इथेतिथे सरकवत विचारले.

"अं..... मला वाटतं दादाने ....म्हणजे बहुधा दादाला आवडलं नसावं....." सीमा चाचरत म्हणाली, "दादा असं काही म्हणाला नाही, पण तसं पाहिलं तर .....दादाला असंच वाटेल ना कि तू ...भरपूर पैशाची मदत करून मुलाला ....आपल्या बाजूला करायला पाहते आहेस...."

मधुराच्या ओठावर एक कडवट हसू पसरलं, "आता उरलं काय आहे आपल्या बाजूला करून घेण्यासारखं? पैशानं विकत घ्यायचं असतं तर तो लहान, काहीसा अजाण होता तेव्हाच नसतं का केलं? आता जेव्हा तो ओळखही दाखवायचं नाकारतो तेव्हा कुबेराचं भांडार ओतूनही मी त्याला जिंकून घेऊ शकणार आहे का?

इतका का घाबरतो तुझा दादा? सांग त्याला, माझा असा काही विचार नाहीये.....
"

मग एक सुस्कारा टाकून म्हणाली, "जाउ दे, जयूला नको असेल मदत तर राहू दे. पण सीमा, जयूला एवढं सांगशील का कि म्हणावं, हवं तर स्वतःच्या हिंमतीवर, शैक्षणिक कर्ज काढून, धडपड करून जसं जमेल तसं जा, पण केवळ मी त्याला नको असलेली आर्थिक मदत करेन या भीतीने स्वतःचं स्वप्नच असं सोडून देऊ नकोस ...... "

सीमाने जेवता जेवता मान डोलावली. मधुराचे तर खाण्याकडे अजिबात लक्षच नव्हते, कुठेतरी हरवल्यासारखी ती बोलली, "हे असं तुझ्यामार्फत पिंगपाँग सारखं बोलणंही ठीक वाटत नाही. पण असा झंझावातासारखा ऑफिसात आला आणि 'काही नको' म्हणून गेला देखील. घरी आला असता तर मी त्याला निवांतपणे समजावू शकले असते, त्याचंही म्हणणं ऐकून घेतलं असतं ......."

"मी सांगून पाहाते त्याला ..." सीमा निघता निघता म्हणाली.

"अगं सीमा विसरलेच, हे घे. तुझ्या करणला हेच विशिष्ट हेडफोन्स हवे होते ना? टोकियोला गेले तेव्हा घेतले होते, पण त्यानंतर आपली भेटच नाही झाली." मधुराने बॉक्स सीमाच्या हाती दिले.

जयू करणहून थोडासाच मोठा, त्यालाही अश्या तांत्रिकी गोष्टींची आवड असणारच. त्याच्यासाठी सर्व घ्यायची इच्छा असूनही ती देणार कशी? कपडे किंवा छोट्यामोठ्या गोष्टींपर्यंत ठीक होतं. पण महागड्या इंपोर्टेड वस्तू 'जय, ही

माझ्यातर्फे गिफ्ट,' असं म्हणून सीमा त्याला देऊ शकत नव्हती. आणि मधुराने त्याच्यासाठी हे आणलंय असं सांगितलं तर झालंच – भेटवस्तू तर क्षुल्लक गोष्ट, तो तर आपल्या आयुष्याचं स्वप्न ही सोडून द्यायला तयार झाला होता.

का, कधी, कुठे तिचं नातं तुटत गेलं होतं? केव्हा तिचा स्वतःचाच पोटचा गोळा तिला परका झाला होता? आताही तिची खात्रीच होती कि सीमाने कितीही समजावले तरी जयू मधुराला येऊन भेटायला कधीही तयार होणार नव्हता.

म्हणूनच जेव्हा आठवड्याभराने तिला जयूचा फोन आला तेव्हा तिचा विश्वासच बसला नाही. अनोळखी नंबर पाहू तिने आधी जरा साशंकपणेच फोन उचलला.

"मी जयू," तिचा प्रश्नार्थक स्वर ऐकून तो बोलला, "मी सीमाआत्याकडून तुम.....तुझा फोन नंबर घेतला. मी....माझा विचार काही बदलेला नाहीए – पण आत्या म्हणाली एकदा भेट....."

"घरी येशील?" मधुराने श्वास रोखून घाईघाईने विचारले, "शनिवारी? रविवारी? नाही, नाही ......केव्हाही, तुला हवं तेव्हा ये. केव्हा येशील? माझा पत्ता .....मेसेज करू का? "

वेळ, वार ठरवून जयने फोन ठेवला. थोडा वेळ मधुराला खरंच वाटत नव्हतं, विश्वासच बसत नव्हता कि जय खरोखरच घरी येणार होता. एका दशकाहून अधिक काळ उलटून गेला होता. छोट्यामोठ्या बऱ्याच गोष्टी काळाच्या ओघात वाहून गेल्या होत्या – आणि आता जयूही मोठा झाला होता. त्याच्या

आवडीनिवडीही नक्कीच बदलल्या असणार. पण तेव्हा त्याला जे जे आवडायचं ते ते आठवून तिने मेन्यू ठरवला. घरात नोकर चाकर होते आणि तिचं स्वतःचं जेवण कोणी, कसं आणि काय बनवलं याकडे ती फारसं लक्ष देत नसे, पण आज तिने स्वतःच्या हाताने सर्व काही बनवलं. एखाद्या अद्ययावत लॅपटॉपसारखं काही तर त्याच्यासाठी भेट द्यायचं तिच्या फार मनात होतं, पण मोठी भेट तो सरळच नाकारेल याची तिला भीती होती.

जयू आला तेव्हा मधुरा फक्त हसतच राहिली, काय बोलायचं तेही सुचेना. मोठमोठ्या मल्टीनॅशनल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांबरोबरच्या दीर्घ मीटिंग्ज यशस्वीपणे हाताळणारी मधुरा हीच का असा तिला स्वतःलाच प्रश्न पडला. ती अशी गोंधळल्यासारखी वागत राहिली तर त्याला निवांत भेटीसाठी घरी बोलावण्याचा काही अर्थ राहणार नव्हता.

आधी तिने खाण्यापिण्याच्या गोष्टी त्याच्यापुढे ठेवल्या. "आता आवडीनिवडी बदलल्या असतील म्हणा, पण माझ्या आठवणीत हे --- चिकू मिल्कशेक, शेझ्वान नूडल्स, दहिवडे, हे सगळं तुझ्या आवडीचं होतं...." ती अर्धवट हसून म्हणाली

"हो...अजून बऱ्याचश्या आवडी तश्याच आहेत..." त्यानेही आढेवेढे न घेता मनापासून खाल्लं.

"मी काय म्हणत होते जयू, " दीर्घ श्वास घेऊन स्वतःला स्थिर करत तिने बोलायला सुरूवात केली, "तुझं स्वप्न आहे ना परदेशी जाऊन शिकायचं, मग ते

असंच सोडून देऊ नकोस. माझी मदत घ्यायची इच्छा नसेल तर ठीक आहे, मी काही करत नाही. हवं तर तू स्वतःच कर्जाची वगैरे खटपट कर, पण विचारच सोडून देऊ नकोस. अरे, मी काही तुला माझ्या बाजूचा करण्यासाठी नव्हते रे म्हणत. मला एवढंच वाटलं की माझं हे जे काही आहे ते शेवटी तुझंच तर आहे ना--- उद्या वापरायचं ते आजच घेतलं तर काय बिघडतं? उद्याला संधी, वय सगळंच गेल्यावर पैसे घेऊन काय फायदा? आणि मला त्याच्या बदल्यात काहीच नकोय. तुला, तुझ्या पपांना ही भीती वाटायची गरज नाही की मी म्हणेन, पपांना सोडून माझ्याकडेच येऊन राहा, किंवा तसंच काही.... माझ्या मनात तसं काही नाही. सगळं अगदी आतापर्यंत होतं तसंच चालत राहू दे. जेवढे काय लागतील ते पैसे घेऊन मागाहून मला तोंडही दाखवलं नाहीस तरी चालेल .... " त्याच्यापासून नजर चुकवत मधुरा म्हणाली.

"नाही, तसं काही नाही.... पण इथेच काही पुढे शिकावं असा विचार केला ....." तो अवघडून चुळबूळ करत म्हणाला.

"जयू, अरे वर्ष - दोन वर्षे तर बघता बघता निघून जातील --- आणि तुझ्या पपांची एवढी चिंता नको करूस, सीमा आहे ना जवळच, त्यांची नीट काळजी घेईल ती...." तो काहीच बोलला नाही, पण त्याची अस्वस्थता तिला जाणवली, मलूलसं हसून ती म्हणाली, " तू असाच विचार करत असशील ना की इतक्या वर्षांत ज्या ममीने साधी विचारपूसही केली नाही तिला अचानक इतका पुळका का आला? तसं नाही रे, मी एकटा जीव. काय करू या कमावलेल्या पैशांचं? ते इतरांनाही

कळतं, जरूर असेल तशी मदत मागतात. जे इतरांच्या कामी येऊ शकतात, तेच पैसे ज्याचा त्यावर हक्क आहे, त्याच्या कामी का येऊ नयेत?"

जय गप्पच राहिला. बोलावं कि नाही असा विचार करत ती काहीसं अडखळत म्हणाली, "आणि इतक्या वर्षांत विचारपूसही का केली नाहीस असं म्हणशील तर ------ वाहत्या काळाबरोबर दुरावा, अवघडलेपणा वाढतच गेला. आता त्याचं इतकं काही वाटत नाही, पण ..... आमच्या डायव्होर्सच्या वेळी जेव्हा तुला विचारलं गेलं, आणि तू ---- तू पपांबरोबर राहण्याचं निवडलस...... तेव्हा मी कुठेतरी दुखावले .....खूप खूप दुखावले गेले रे. अपेक्षा ठेवल्या की अपेक्षाभंगाचे दुःख होतेच. मी तर केवळ अपेक्षा नाही, तर गृहितच धरलं होतं कि सगळया घटस्फोटित परिवारातील मुलांसारखा तू ही नेहमीच माझ्याबरोबरच राहशील. पण तू ...."

जयचे डोळे विस्फारले, पण तरीही तो काहीच बोलला नाही. पुन्हा मधुराच समजावत म्हणाली, "अर्थात, तुला तुझी कारणं असतील. नाही, मी कसलंही स्पष्टीकरण मागत नाहीए. फक्त माझ्या वागण्याचा खुलासा करतेय. कोर्टानं मला भेटीचे हक्क दिले होते आणि माझी खात्री आहे कि तुझ्या पपांनीही, मनात कितीही भीती असली तरी, मला भेटी नाकारल्या नसत्या. पण मीच कुठेतरी खचून गेले होते कि माझ्या मुलाला मी नकोय --- म्हणजे मला भेटायचीही त्याला इच्छा नसणार. मग स्वतःला का जबरदस्तीने लादावं....असंच काही तरी. आणि मग दुरावा वाढतच गेला. पण जयू, ही सेल्फपिटी मात्र अजिबात नाहीए हं. जसं

झालं तसं सांगतेय. किंवा तुला इमोशनल ब्लॅकमेलही नाही करत आहे, कि तेव्हा असं झालं म्हणून आता तू माझा प्रस्ताव स्वीकार करावा. नाही --- मी फक्त इतके वर्ष का विचारलं नाही ते सांगितलं... "

जयू काही बोलतच नव्हता, तिलाच विचित्र वाटू लागलं कि ती एकटीच बोलत जात होती. तो अस्वस्थपणे शर्टाच्या टोकाचे दोरे ओढत होता. त्याच्या गप्प बसण्याने मधुराला अधिकच अस्वस्थ वाटू लागले. पण कशासाठीही त्याच्यावर जास्त दबाव टाकायचा नाही किंवा कसलीही अपेक्षा ठेवायची नाही हे तिने आधीच मनाशी ठरवलं होतं. निदान आला, भेटला, तिचं म्हणणं ऐकून घेतलं, हेही खूप झालं. इकडच्या तिकडच्या अवांतर विषयांवर बोलण्याचा त्या दोघांनीही प्रयत्न केला, पण संभाषण काही पुढे सरकेना. तेव्हा, 'पाहू, पुन्हा बोलू,' असं काहीसं पुटपुटत जयू निघाला.

पॅसेजमधून दाराकडे जातांना असलेल्या मोठ्या कपाटाकडे तो बूट घालायला थांबला. त्याला ते कपाट उघडून दाखवायची तिला खूप इच्छा झाली. ऑफिसच्या कामासाठी ती जेव्हा जेव्हा जिथे जिथे गेली, तिथल्या खास गोष्टी आवर्जून जयूसाठी घेऊन येत राहिली. पण त्या काही ती सीमामार्फत देऊ शकत नव्हती, कारण परदेशातच मिळू शकतील अश्या खास गोष्टी सीमा 'हे मी तुझ्यासाठी आणलयं', असं म्हणून जयूला देणं शक्य नव्हतं. त्या सगळया वस्तू, अगदी लहान मुलांच्या टॉय ट्रेनपासून आताच्या अत्याधुनिक उपकरणांपर्यंत सारं त्या कपाटात होतं, जयूसाठीच होतं. पण एकदम एका भेटीतच सगळा भडीमार केला तर कदाचित तो भांबावून अधिकच दूर राहील ही तिला भीती होती.

अर्थात आतादेखील पुन्हा भेटेल की नाही हे एक मोठं प्रश्नचिन्हच होतं. त्याबद्दल तो काही बोलला नव्हता, पण त्याबद्दलच का, तो तर कशाबद्दलही काही बोलला नव्हता. त्याला केवळ तिच्याबरोबरच फारसं बोलायची इच्छा नव्हती का एकंदरीतच तो असा घूमा झाला होता? एका गोष्टीतून हजार गोष्टी काढून, आता पुरे बाबा, म्हणावं लागेपर्यंत बोलणारा जयू घूमा, अबोल? कश्यामुळे झाला हा बदल? त्याच्या आईवडिलांच्या घटस्फोटामुळे?

पूर्वीच्या गोष्टी उकरून काढून स्वतःला मुलाची दोषी ठरवून घेण्यात अर्थ नव्हता – स्वतःला समजावत तिने प्रयत्नपूर्वक आपले विचार भविष्याकडे वळवले. काय करेल तो? तिची मदत घेऊन जाईल पुढच्या शिक्षणासाठी? त्याचे पपा घेऊ देतील त्याला असा निर्णय?

रोजची कामं, ऑफिस, मीटिंग्ज चालू राहिले, पण तिचं मन जयूच्याच प्रश्नाभोवती घुटमळत होतं. त्यालाच सरळ फोन करून विचारावं का? पण तिचं मन कचरत होतं. आणि सीमाला तरी किती वेळा त्रास देणार? काही दिवस उलटून गेले, कुठूनच काही खबर मिळाली नाही तेव्हा मधुराला कळून चुकलं की जयूने काही आपले विचार बदलले नाहीत, ना तिचा प्रस्ताव स्वीकारला. तिने आपल्या मनाची समजूत घातली की तिने निदान प्रयत्न तर केला.

त्या दिवशी ऑफिसमधून परततांना सीमा दिसली. अशी ती कधी भेटली तर मधुरा तिला तिच्या घरापर्यंत लिफ्ट देई. दोघींचे इकडचे तिकडचे बोलणेच चालले होते. मधुराला जयूबद्दल विचारायचे फार मनात होते, पण ती घाबरत

होती की तिला नको असलेले उत्तर ऐकायला मिळेल. मग बोलता बोलता सीमाच म्हणाली, "अगं मी सांगितलं का तुला, जयूने जाण्याच्या दृष्टीने तयारी सुरू केली बरं. ..म्हणजे ते परीक्षा देणे, युनिव्हर्सिटी शोधणे....ते सगळं. "

"म्हणजे त्याने जायचं ठरवलं? व्वा!" मधुरा आपल्या आवाजातली खुशी लपवू शकली नाही. पण तिची मदत घेणार की नाही हा तिच्या मनातला प्रश्न अनुत्तरितच होता. जणू ते समजल्यासारखी सीमा म्हणाली, "देव जाणे कसं, पण त्याने समजावलं दादाला – तुझे पैसे वापरण्याबद्दल. दादाही आता काही बोलत नाहीए...." मधुराला अचानक गळा दाटून आल्यासारखं झालं. तिची स्थिती पाहून सीमा आश्चर्याने म्हणाली, "म्हणजे? तुला हे माहीतच नव्हतं का? मला वाटलं आता जय नि तू नियमित संपर्कात असाल, निदान एवढं तरी माहीत असेल..."

“नाही....अगं, इतक्या वर्षांचा खंड पडला मध्ये, असं एकदम मोकळेपणाने बोलणं सहज शक्य नसेल होत. होईल हळूहळू...“ मधुरा समजूतदारपणे म्हणाली. पण ती खुश होती ...खूप खूप खुश होती. घरी पोहोचल्यावर तिनेच जयूला फोन केला आणि जे जे काही लागेल ते ते तिला कळविण्यास सांगितले. त्यानंतर ती स्वतःहूनच, त्याच्या फोनची वाट न बघता, मधून मधून त्याला कॉल करून कुठल्या टेस्ट्स झाल्या, कुठले फॉर्म्स भरले वगैरे विचारू लागली.

प्रथम प्रथम जय थोड्या औपचारिकतेनेच, जरा अवघडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देई आणि तिला जरा विचित्रच वाटे कि ह्याची माझी पहिल्यांदाच

ओळख झाली की काय? पण काही भासवू न देता ती नेमाने विचारपूस करत राहिली आणि मग तो हळू हळू खुलला, मोकळेपणाने बोलू लागला. कधी स्वतःहूनच काय प्रगती झाली ते सांगू लागला, अधून मधून घरीही येऊ लागला.

समीर बहुधा वास्तविकतेच्या दुनियेपासून काहीसा दूर आपल्याच राज्यात रमलेला असायचा. तेव्हा कुठल्याही ऑफिसात जयला जायचे असल्यास मधुराच त्याच्याबरोबर जाई. असंच एकदा जायचं होतं, मधुरा लवकर निघून त्याला पिकअप करणार होती. पण तोवर त्याचा फोन आला कि पपांबरोबर त्यांच्या कामासाठी कुठे जायचं असल्याने त्यादिवशीचं त्याचं स्वतःचं काम रद्द करावं लागलं. मग उशीराने संध्याकाळी तो तिच्या घरी आला. "अगं, पपांबरोबर त्यांच्या एका क्लाएंटकडे जायचं होतं. चांगलं मोठं काम मिळण्यासारखं होतं – एका कंपनीच्या पूर्ण मोठ्या ऑफिससाठी त्यांना बरेचसं आर्टवर्क हवं होतं....."

"म्हणजे? पपांच्या या कामांसाठी तू जातोस का बरोबर? बरं करतोस बाबा.....," त्याच्यासाठी पटापट् शेव-बटाटा पुरी बनवत मधुरा मनापासून त्याला म्हणाली.

"हो ना, तुला तर माहीत असेलच – पपा अश्या कामांच्या बाबतीत तसे कमीच व्यावहारिक आहेत....." दिवसभर बाहेर राहून त्याला भूक लागली असावी, त्याचं जास्त लक्ष खाण्याकडेच होतं, खाता खाता काहीश्या गाफीलपण बोलला, "अश्या मिटींग्जमध्ये काहीतरी क्षुल्लक कारणांवरून त्यांचं बिनसतं आणि हाताशी आलेली चांगली कामं जातात ....."

तो पपांची तक्रार करण्यासाठी नव्हता सांगत, पण त्यांच्या काळजीपोटी बोलत होता हे ती समजू शकत होती. "हो रे, मला आहे कल्पना...." मधुरा सुस्कारा टाकत म्हणाली, "तिथूनच तर झाली सुरूवात वादविवादांची...." ती अनवधानाने बोलून गेली. समीरविषयी त्याच्याशी काही बोलायचं नाही हे तिने आधीपासूनच ठरवलं होतं. त्यानेही कधी विषय काढला नव्हता. पण आता जेव्हा ती बोलून गेली, तेव्हा तो जरी काही म्हणाला नाही, तरी तिच्याकडे अपेक्षेने पाहात राहिला.

“आता मागचा विचार केला तर मला वाटतं थोडं माझंही चुकलंच असावं.....” ती भूतकाळात काहीशी हरवून बोलत राहिली, " समीरच्या कलेला मुक्त हस्त मिळावा म्हणून मी स्वतःहूनच नोकरी करायचं स्वीकारलं होतं, तेव्हा मागाहून त्याच्या काम न घेण्यावरून त्याला टोकायला नको होतं. तो स्वच्छंदी कलंदर माणूस --- आपल्याच कलेच्या राज्यात रमणारा. रोजची डाळ-तांदळाची गरज त्याच्या कधी ध्यानात आलीच नाही. लग्न, संसार सगळं काही दूरचे प्रश्न वाटायचे त्याला. माझं चालून जायचं कसंही, पण लहान मूल आलं घरात, मग त्याचं दूध-खाणं, औषध-पाणी हे तर सारे कंपल्सरी खर्च, त्यासाठी तर पैसे जरूरी. मग त्याला मन मारून पेंटिंग्जच्या, आर्टवर्कच्या ऑर्डर्स घ्याव्याच लागत. त्याची घुसमट पाहवली नाही म्हणून मी नोकरी करायचं ठरवलं. म्हणजे मग त्याला जे काम पसंत आहे तेवढंच करायची त्याला मोकळीक राहील..."

"म्हणजे? तू आधीपासून नोकरी नव्हती करत?" जयूने काहीश्या आश्चर्याने विचारले.

"नाही, तू वर्षाचा झाल्यावर...." ती अजूनही भूतकाळातच होती, "नोकरी करता करता मी कुठेतरी हिशेबी, व्यवहारी बनत गेले. पण असं काही नव्हतं कि मी कमावते नि तो काही फारसं कमावत नाही, म्हणून त्यानेही कसंही करून पैसे मिळवावेत....नाही, तसं नाही कधी मनात आलं. पण तो आपल्या लहरी स्वभावापायी आपली कला वाया घालवतो आहे असं काहीसं वाटू लागलं. तो आपल्या कलेने खूप मोठा होऊ शकत होता, प्रसिध्दी, नाव, पैसा सगळं काही हवं तेवढं मिळवू शकत होता. पण केवळ आपल्या मूडप्रमाणे वाहत जाऊन कामं नाकारणं, कधी कधी तर आपली पेंटिंग्ज विकायला नकार देणं..... मला काहीच कळेनासं झालं होतं कि---"

"म्हणजे तू ----" तो काहीसा अडखळला, पण मग निश्चयाने बोलला, "स्वतःच्या करियरसाठी ...हे सगळं..."

मधुराने जरा चमकून त्याच्याकडे पाहिले, पुन्हा वर्तमानात येत हसून म्हणाली, "तुझा दोष नाही रे, सगळयांनाच असं वाटतं की मी म्हणजे खूप महत्त्वाकांक्षी, करियर-माईन्डेड – स्वतःच्या उन्नतीसाठी घरदार, मुलालाही सोडणारी. पण ....... नोकरी धरली ती घर चालवण्यासाठी. आणि ---- मग फक्त नोकरीच राहिली हातात... दुसरं काहीच नाही...."

जय नजर चुकवून दुसरीकडे पाहू लागला. त्याला अपराधी वाटू नये म्हणून खांद्यावर थोपटत ती म्हणाली, "मग स्वतःला पूर्णपणे झोकून दिलं कामातच, भराभर पायऱ्या चढत गेले - खूप यश कमावलं. पण कोणासाठी? मला तर काही

खास हव्यास नव्हता, दुसरं काहीच नाही म्हणून काम. पैशाचं करू काय? एकदा वर्ल्ड टूरसाठी नावही दिलं, पण उमेदच नव्हती, शेवटच्या क्षणी रद्द केलं. तसंही कामानिमित्ताने जगभर फिरणं होतच असतं....." विषय निघालाच होता तर तिने ते मोठे कपाट उघडून खास त्याच्यासाठीच आणलेल्या साऱ्या वस्तू त्याला दाखवल्या. दहा अकरा वर्षांच्या मुलाच्या खेळण्या-कपड्यांपासून ते आजच्या नवनवीन गोष्टी पाहून तो स्तंभितच झाला. "सगळं तुझंच आहे, जे आवडेल ते घे. लहान पोरांच्या गोष्टी आहेत त्या ठेऊ तुझ्या मुलांसाठी ......" ती हसली.

पायरी पायरीने जयच्या तयारीला जोर चढत होता. अर्ज झाले, ॲडमिशन मिळाली. तिथे राहण्यासाठी घर, रूममेट्स् शोधणे....हे सर्व नेटवरून नि मधुराच्या सोबतीनेच करत होता. समीरला, त्याच्या पैशाच्या अभावामुळे सर्व कामांतून दूर ठेवलं जातंय असं त्याला वाटू नये म्हणून त्यालाही सर्व बाबतीत सामील करण्यासाठी ती पुन्हा पुन्हा जयला सांगत राहिली.

त्यानंतर खरेद्या – तिने आपल्या खात्यातून त्याला कार्ड बनवून दिलच होतं, त्यामुळे जे काही खरेदी करायचं ते तू स्वतःच कर, नाहीतर पपा, मित्र किंवा सीमाआत्याच्या मुलांबरोबर कर, असं म्हणून ती त्यातून दूरच राहिली. ऑफिशियल ठिकाणी तिच्या सह्यांची गरज असल्याने तिला सोबत जावे लागे. पण ती पैसे देत आहे म्हणून पुढाकार घेऊन तिनेच सर्व काही करावे, हे थोडसं कब्जा करण्यासारखं होईल, तिने मुलाला पूर्णच बळकावून घेतलय असं बाकी कुणाला नाही तरी समीरला नक्कीच वाटेल, असा विचार करून ती शक्यतो दूरच राहिली.

शेवटी त्याच्या फ्लाईटच्यावेळी देखील तिने जयला आधीच सांगून ठेवले की ती काही एअरपोर्टला येणार नाही. त्याने बरेच सांगून पाहिले, पण तिने ऐकले नाही. तेव्हा जय त्यादिवशी आधीच तिला भेटून गेला. मधुराला ठाऊक होतं, ती जयला सोडायला गेली तर समीर तिथे येणार नाही, आणि त्याला राहवणारही नाही, तेव्हा न गेलेलंच बरं. समीरला तेवढा हक्क होता आणि ती तो हिरावून घेऊ इच्छित नव्हती. ती आणि जय एकमेकांना तसे परकेच होते. आता या निमित्ताने तो जेवढा काही तिच्या वाट्याला आला होता तेवढेही तिच्यासाठी पुरेसे होते. निदान आता तो दुरावा राहिला नव्हता, आपलेपणा रूजला होता. तो एकूणच कमी बोलायचा, पण मनाने जवळ आला होता.

आता तो ही दूर गेला होता --- परत येईल म्हणा, नि हे पुन्हा जोडले गेलेले बंध आता तुटायचे नाहीत, निदान तशी तिला आशा होती. मधुराने पुन्हा एकदा स्वतःला कामात झोकून दिलं, ते तर नित्याचंच होतं. मध्यंतरी जयच्या जाण्याच्या गडबडीने दोन महिने काय बदल आला होता तेवढाच.

मधून मधून फोन करून जय तिला नवीन हालहवाल कळवत होता – आज काय मेडिकल टेस्ट झाली, आज ओरिएन्टेशन होतं....हळूहळू त्याचं बस्तान बसलं.

मग एक दिवशी त्याची ई-मेल आली. तिला आश्चर्यच वाटलं ------ "बरंच काही बोलावसं वाटत होतं, पण मला तेवढं मोकळेपणाने बोलणं जमत नाही आणि मग मनातच सारं राहून जातं. म्हणून हा लिहिण्याचा प्रयत्न .....

अगदी पहिल्यापासून म्हणायचं तर --- मला कोणाबरोबर राहायचंय हे विचारल्यावर मी पपांबरोबर राहण्याचं निवडलं, पण त्यामध्ये तुला दुखावण्याचा किंवा तुला नाकारण्याचा अजिबात विचार नव्हता. ते एका लहान मुलाचं साधं गणित होतं. पपा नेहमीच घरात असत, शाळेतून आल्यावर, इतर रिकाम्या वेळी मला नेहमी त्यांच्याबरोबरच राहण्याची सवय होती आणि ते तसंच चालू राहावं या साध्या हिशोबाने मी ती निवड केली होती.

तू ऑफिसात जायचीस आणि घरी आल्यावरही सतत घरकामात, काही ना काही करण्यात गुंतलेली असायचीस. आता इतक्या वर्षांनी कळलं कि ते सर्व तू पपांना मोकळीक मिळावी यासाठी आणि माझ्यासाठीच करत होतीस. पण तेव्हा पपा घरात असल्याने बारीक सारीक गोष्टी त्यांना सांगायची आणि त्यांच्याकडूनच करून घ्यायची हीच सवय. आणि त्यापोटीच मी ती निवड केली. मला वाटतं तू हे समजून घेशील.

आताही निघण्यापूर्वी प्रत्येक बाबतीत, खरेदी करायची असो वा एअरपोर्टला सोडायला यायचे असो, मला तू खरोखरच सोबत हवी होतीस. केवळ तू सगळे पैसे भरलेस म्हणून तुझ्या मनाच्या समाधानासाठी मुलाबरोबर सगळीकडे येण्याजाण्याची तुला संधी मिळावी यासाठी मी ते म्हणत होतो असे अजिबात नाही. पण तुझ्या दृष्टीने तू ही बरोबरच असावीस ...."

शब्द पुढे चालूच होते, पण डोळ्यात तरारलेल्या पाण्याने सगळं धुरकट झालं. टेबलावर डोके टेकवून मधुराने आपल्या आनंदाश्रूंना मुक्त वाट करून दिली.

---

# अन्याय

तो रडत होता. पण त्यात नवीन ते काय? त्याचं हे नेहमीचच होतं....

'तो', 'त्याचं' ....नेहमी हे असंच. अमृताने कधी त्याला --- अगदी मनातल्या मनातही ---- नावाने संबोधले नाही. आईने घरच्या घरीच का होईना, पण रीतसर पाळण्यात घालून त्याचं नाव ठेवलं होतं.... करण. खास तिच्या पसंतीचं. लहान असतांना ती नेहमी हट्ट करायची कि दादाने माझे नाव अमृता ठेवले, तसे आता मी माझ्या पाठच्या भावाचं नाव ठेवणार करण. पण तसे काही झाले नाही आणि तिच्या आवडीचं नाव राहूनच गेलं होतं. ते लक्षात ठेऊन आईने आता बाळाचं नाव मुद्दाम तेच ठेवलं होतं. तरीही ......

अमृताला ते नाव काय, ते मूलच डोळ्यासमोर नको होतं. असं वाटत होतं ......असं वाटत होतं कि त्याला उचलून दूर कुठेतरी फेकून द्यावं. ती मनातच चरकली. आपल्याच मुलाबद्दल मी असं कसं म्हणू शकते? पण मग मी करू तरी काय? तिच्या मनाने मूक आक्रोश केला. ज्या कारणासाठी त्याला जन्माला घालायचा आटापिटा केला होता त्याच्या अगदी विरूध्दच झालं होतं. माझा काही दोष नसतांना मला का ही शिक्षा? आणि आता का ह्याला सांभाळत राहू? --- तिच्या मनाने टाहो केला. आणि त्या आक्रंदनापुढे तिला तिच्या मुलाचा आवाज ऐकू येणं शक्यच नव्हतं.

"अमृता, अगं केव्हाचा रडतोय तो," पूजावहिनी एकदम खोलीत येत म्हणाली, "जरा उचलून शांत कर ना त्याला...."

अमृताच्या जिभेवर आलं होतं कि म्हणावं, "तुला हवं तर तूच उचल आणि गप्प कर त्याला....." पण वहिनीचा सूर चांगलाच कडक वाटला, तेव्हा पुन्हा बोलून शब्दाने शब्द वाढायला नको, म्हणून अमृताने पलंगावर समोरच रडणाऱ्या मुलाला धसकन उचलून घेतले. "अगं, हळू हळू," वहिनी ओरडली, "तुझाच लेक आहे ना तो? एखाद्या वैरिणीच्या मुलाशी करावा तसा द्वेष करतेयस त्याचा...."

"वैरिणीचं मूल कशाला, तो स्वतःच माझा जन्माचा वैरी आहे, " जाणाऱ्या वहिनीच्या पाठीकडे पाहात अमृता मनातच पुटपुटली. वहिनी जाताच त्याला पुन्हा पलंगावर टाकलं आणि त्याने रडायला सुरूवात करताच डोळे वटारून त्याच्यावर फिस्कारली, "चूप, एकदम चूप!" ते एवढंस तान्हं, त्याला काय कळतय, पण तरी ते आवाज न करता घुसमटल्यासारखं मुसमुसत राहिलं.

अमृता भिंतीला टेकून भकास डोळयांनी छताकडे पाहात राहिली. काय झालं होतं हे तिच्या आयुष्याचं --- ? किती स्वप्नं पाहिली होती तिने भविष्याची .... तिच्या आणि अनिषच्या भविष्याची. आणि हळू हळू ती स्वप्न साकारही होत होती, किंवा निदान तिला तरी असं वाटलं होतं -----

अमृता आणि अनिष तसे एकमेकांच्या ओळखीचे, घरचेही थोडेफार एकमेकांच्या परिचयातले होते. दोन्ही घरांना ओळखणाऱ्या कुणीतरी लग्नाचा प्रस्ताव ठेवला आणि सगळयांनाच तो पसंत पडला. तसा प्रेमविवाहही नाही आणि

अगदी मुलगी बघून ही नाही. पण जे काही होतं ते परस्परांना आणि दोन्ही घरच्यांनाही मानवणारं होतं. मग साखरपुडा आणि यथावकाश लग्नही झालं.

दोघेही भरपूर शिकलेले, दोघांनाही चांगल्या पगाराच्या नोकऱ्या. मुंबईत जागेची अडचण, तेव्हा सासऱ्यांनी स्वतःहूनच मुलांनी वेगळं घर घ्यावं असं सुचवलं. अमृता व अनिष दोघांनीही घरासाठी कर्ज काढून जोड-नावावर नवीन घर घेतलं, ते सजवलं. त्यावेळेस अनिषने त्याचे विचार मांडले, तसे काही आपले फारसे वय झालेले नाही, दोघांच्या करियरची नुकतीच सुरूवात झाली आहे. तेव्हा मला तरी असं वाटतं की सध्या काही वर्ष दोघांत तिसरं नकोच. दोघंही आपापल्या क्षेत्रात पैसा, कामाचं समाधान कमावूया; सर्वार्थानं अजून मोठं होऊया. मग अश्या भरभराटीच्या दुनियेत मुलाचं स्वागत करायचं, काय म्हणतेस?

अमृताला मुलांची आवड होती, पण त्याचं म्हणंण तिलाही पटलं. खरं तर तिला गंमतच वाटली. इतर स्त्रियांची एकच तक्रार असे की लग्न होताच मुलं, संसार या सर्वांमध्ये बायका खुंटाला बांधल्या जातात, पुरूष त्यांच्या करियरमध्ये स्वतःची प्रगती करतात, पण बायकांचं काय? आणि इथे तर नवराच तिला हिरवा सिग्नल दाखवत होता. ती खरच भाग्यवान!

म्हणता म्हणता दिवसांचे महिने आणि महिन्यांची वर्षे झाली. घराच्या कर्जाचे हप्ते भरून झाले, घरात नवनवीन सुखसोयी आल्या, कार ही आली. दोघांच्या करियर्स जोमाने पुढे चालल्या होत्या, आपापल्या कामात नावाजले जात होते.

पण मग काहीतरी खटकू लागलं. मिठाईचा आनंद घेतांना मध्येच दाताखाली मिठाची कणी यावी तसच काहीतरी. प्रथम अमृताला ते आपल्या मनाचे भास वाटले. पण मग कोणी कोणी आडून सावधानतेचा इशारा देऊ लागले. काही जवळच्या मैत्रिणी तर तिला स्पष्टच सांगू लागल्या. अमृता पुरती हादरून गेली ---- अनिष त्याच्या ऑफिसातील कुणा मुलीमध्ये गुंतत चालला होता.

अमृताचं मन बधीर होऊन गेलं. काही सुचेना. आता मी काय करू? पण काय करायचं हे पाहाण्याआधी मुळात हे असं का झालं याचा विचार करणं जरूरी होतं. तिनेच काही कारण दिलं होतं का? पण ....तिचं काय चुकलं? अमृताने आपलं वागणं-बोलणं तपासून पाहाण्याचा प्रयत्न केला. तिला काहीच वावगं वाटलं नाही – तसं प्रत्येकालाच आपलं काहीच चुकलं असं वाटत नाही, तिने स्वतःलाच दटावलं. विचार कर-करून, अगदी त्रयस्थाच्या नजरेतूनही आपलं वागणं पाहिलं तरी काही मोठे दोष किंवा फार टोकाचे मतभेद असं काहीच सापडलं नाही. तसं प्रत्येक संसारात थोडफार डावं-उजवं असणारच. पण त्याव्यतिरिक्त फारसं काहीच वाईट नव्हतं.

अमृता तशी दिसायलाही उजवी, चारचौघीत उठून दिसणारी होती. कपडे, राहाणी नीटनेटकी. पैशावरूनही कधी तुझं-माझं असं झालं नव्हतं. मग --- बिनसलं कुठे?

विचार करकरून अमृताचं डोकं फुटण्याची वेळ आली, पण तिला कशाचंच उत्तर मिळेना. कधी काहीच न सुचून तिरीमिरीने तिला वाटे सरळ

अनिषपुढे उभे राहावे आणि त्याला गदागदा हलवून विचारावे कि मी काय चूक केली, मी कुठे उणी पडले कि तुला दुसरीत मन रमवण्याची आवश्यकता भासावी? पण विचारून काय होणार होतं? कारण अजूनही तो जवळजवळ अगदी पहिल्यासारखाच वागत-बोलत होता, कुठेही शंका घेण्याचं कारणही दिसत नव्हतं. तिला जर का तिच्या अगदी खात्रीच्या लोकांनी हे सांगितलं नसतं तर अनिषच्या वागण्यातून तर तिला कधीच संशय आला नसता.

आता शंकेचं बी मनात रूजल्यानंतर ती शोधू लागली, बारीक लक्ष ठेवू लागली नि लहान-मोठ्या गोष्टी तिच्या ध्यानात येऊ लागल्या –दोघांचे पासवर्डस् एकमेकांना माहीत होते, पण आता त्याने त्याचा बदलला होता. कधी खिशातून एखाद्या मॉलचं मोठंसं बिल मिळे, पण घराच कुठलीच नवी वस्तू वा कपडे दिसून येत नव्हते....

पण आता करायचं तरी काय? हातावर हात धरून जे होईल ते पाहायचं आणि आपलं नशीब, असं समजून स्वस्थ बसायचं? पण कां....? तिला तर विचारही सहन होत नव्हता. तिचा संसार, तिचं छोटसं घरकुल सगळ उध्वस्त होण्याच्या मार्गावर होतं नि ती काहीच करू शकत नव्हती? तिला अनिषवाचून, तिच्या घरावाचून जगणं ही कल्पनाच असह्य होत होती. काही तरी करायलाच हवं....

आपल्याला जसं सुचेल तसं ती करत गेली. स्वतःकडे लक्ष पुरवू लागली. तशी ती कधीच फारशी निष्काळजी नव्हती, पण आता थोडे नवीन कपडे, वेगळी

हेअरस्टाईल ....आपल्यापरीने प्रयत्न करत राहिली. अनिष किंवा त्याच्या वागण्यात फारसा काही फरक वाटला नाही.

मग अमृताने बाहेरगावी जायची टूम काढली. सततच्या धावपळीच्या जीवनातून दोघांनाही थोडातरी विसावा हवा म्हणून हट्ट धरला. त्यापाठी तिचा हेतू वेगळाच होता, अनिषला त्याच्या ऑफिसपासून दूर नेले आणि ते दोघेच दोघे एकत्र असले तर त्याला विसर पडेल, पुन्हा तो तिचाच – केवळ तिचाच होईल ही वेडी आशा वाटली. त्याने आधी टाळाटाळ केली पण त्यामुळे तिला शंका येईल या विचारानेही असेल, शेवटी मंजूरी दिली.

या सर्वाचा काही फायदा नाही हे लवकरच तिच्या ध्यानी आले. बाहेरगावी जाऊन वरकरणी तो अगदी मजेत असल्याचे दाखवत होता, पण ती आसपास नाही असे पाहून फोन लावायचा, नेटवर्क मिळालं नाही की अस्वस्थ व्हायचा, खरेदीला गेलं की तिचं लक्ष नाही असं समजून छोट्या पण किंमती वस्तू पटपट खरेदी करायचा. ती अजूनच खचत गेली, त्यांच्या नात्याचा शेवट तिला नजरेसमोर दिसू लागला.

नाही, असा कसा ती शेवट होऊ देईल? काही तरी करायलाच हवं. मग ती अचानक थबकली – ती का एवढा अट्टाहास करत होती? तिला सोडून त्याने दुसरीच्या प्रेमात पडणं हा तिला तिचा अपमान वाटत होता का? केवळ तिचा अहं, तिचा इगो दुखावला गेल्यामुळे ती त्याला जाऊ द्यायला तयार नव्हती? ती अंतर्मुख झाली, आपलेच विचार परखडपणे तपासून पाहिले – आणि तिच्या लक्षात आले की

नाही, केवळ इगोपायी ती एवढी तडफडत नव्हती. ती खरोखरच अनिषशिवाय जगण्याची कल्पनाच करू शकत नव्हती. तिच्यासाठी तोच आता सर्व काही होता.

अमृताने आजूबाजूच्या, घरच्या, ऑफिसच्या सर्व ओळखीच्या जोडप्यांमध्ये काही उत्तर मिळते का हे शोधण्याचा प्रयत्न केला. आजच्या धकाधकीच्या जीवनात सर्वच पतीपत्नी आयुष्य घडविण्यासाठी सतत धावपळच करत असतात. मग? त्यांच्यात नसेल येत दुरावा? कुठल्या दुव्याने मधली दरी सांधत असतील ते?

मुलं – मुलंच आईवडिलांना एकत्र जखडून ठेवतात. मुलांची आजारदुखणी, त्यांचे शाळा-कॉलेजचे प्रवेश, त्यांचे वरचेवर उद्भवणारे काही ना काही प्रॉब्लेम्स हे नवरा-बायकोला त्या मुलांशी, आपल्या घराशी आणि पर्यायाने एकमेकांशी बांधून ठेवतात. अपवादही असतात नि होतातही घटस्फोट, पण अधिकांश जागी हे बंधनच बांधून ठेवते. अमृताच्या या विचारांत तिच्या मैत्रिणींच्या शेऱ्याची भर पडली, एकेकटे असले की भरकटायला वेळ लागत नाही. मुलं असली की दुसऱ्या स्त्रीचा काय, स्वतःचा विचार करायलाही फुरसत मिळत नाही.

हे शहाणपण आता सुचून काय फायदा? पण अमृताच्या मनाने ही निराशेची काजळी झटकून टाकली. का फायदा नाही?

तिला शंका आली आहे याचा त्याला पत्ताही नव्हता आणि तिला काहीही संशय येऊ नये म्हणून त्याचे अगदी सगळेच वागणे अजूनही पूर्वीसारखेच होते,

निदान तो तसे ठेवण्याचा प्रयत्न करत होता. त्यातला खोटेपण तिला माहीत असल्याने ते सारे ढोंग वाटत होते. पण ती त्याचाच फायदा घेऊ शकत होती.

अमृताने गोळया घेणं बंद केलं – त्याला न सांगता. पण सर्वच काही आपल्या हाती असतं असं नाही. देवाची, दैवाची साथही हवीच. आणि तिने असंही ऐकलं होतं की मन जितकं तणावाखाली असेल तितकांच फळ पदरात पडायला वेळ लागतो. वाट पाहाणं एवढंच ती करू शकत होती.

पण शेवटी शंभरदा खात्री करून घेऊन ती जेव्हा ही आनंदाची बातमी अनिषला सांगायला गेली तेव्हा धक्का बसण्याची वेळ तिच्यावरच आली – परिणाम उलटाच झाला. कारण त्यांचं नातं तुटण्याची ही प्रक्रिया जी बरीच संथपणे सरकत होती, ही बातमी ऐकताच त्या प्रक्रियेने वेग धरला.

अनिषने जे आतापर्यंत गुपित ठेवले होते ते आता त्याने सरळच तिच्या तोंडावर फेकले. "मला हा मुलाचा गुंता मध्ये नकोय. तू अबॉर्शन करून घे. तसे न केल्यास त्याच्या जन्माच्या आतच डायव्होर्स झालाच पाहिजे......" त्याने स्पष्टच सांगितले. तिने लाख विनवण्या करून पाहिल्या, पण त्याचा निश्चय पक्का होता. त्याच्यापुढे तिला मुलाची पर्वा नव्हती, पण तरीही आज ना उद्या पोटातल्या मुलामुळे त्याचं मन द्रवेल या वेड्या आशेपायी ती अबॉर्शन करण्याची चालढकल करत राहिली, सतत त्याच्या पाठी राहून त्याचं मन वळवण्याचा प्रयत्न करत राहिली. या सर्वात ती स्वतःलाही विसरून गेली. आणि जेव्हा त्याच्यावर कशाचाच काही परिणाम होत नाहीए हे तिच्या ध्यानात आले तेव्हा बराच उशीर झाला होता, तिला प्रेग्नन्सी पुढे चालूच ठेवावी लागली.

अमृताला कशाचंच भान उरलं नव्हतं. अनिषने तर डायव्होर्स फाईलही केला. दोघांनी म्युच्युअल कन्सेन्टची कबूली दिली तर दोघांनाही फारसा त्रास होणार नाही यासाठी तिलाही विरोध न दाखवता आपली मंजूरी देण्यास त्याने भाग पाडले. आता जास्त लढून फायदा होणार नव्हता हे तिलाही कळून चुकले होते. तिच्या गरोदर अवस्थेमुळे कोर्टात प्रश्न उभे ठाकले, पण तिने स्वतःनेच आपली मंजूरी असल्याचे निर्विकारपणे सांगितल्याने फारसे आक्षेप होऊ शकले नाहीत. ती तर अगदी बधिरावस्थेतच या साऱ्या दिव्यातून जात राहिली.

मुलाचा जन्म आधी झाला का त्याआधी घटस्फोट मिळाला याची नोंदही तिच्या सुन्न मनात झाली नाही. तिला त्या मुलाचे तोंडही पाहण्याची इच्छा नव्हती. गोठून गेल्यासारखी तासन् तास ती एका जागी बसून राही. मुलाला उचलणं, पाजणं, सांभाळणं हे तर दूरच, ती त्याच्याकडे पाहायलाही नकार देत होती. आईचंही आता वय झालं होतं. ती जमेल तितकं करतच होती पण सगळच करणं तिच्या वयाला, तब्येतीला झेपत नव्हतं.

आई कधी अमृताला हलवून तिच्या या अवस्थेतून बाहेर काढायचा प्रयत्न करी, "अगं, कशी आई आहेस तू? तुझ्या रक्तामासांचं पोर ना ते? जीव कळवळत नाही तुझा? असं कसं तुझं मन दगडाचं झालं? एक साधन म्हणून वापरलंस तू त्याला आणि जेव्हा तुझा हेतू साध्य झाला नाही, तर असं फेकून द्यायचं त्याला? त्याचा बिचाऱ्याचा काय दोष आहे? जन्मालाच का घालावं आधी?....." तिची आई रडकुंडीस येई, पण अमृता तशीच राही – स्तब्ध.

अमृताच्या मनात सतत एकच प्रश्न वादळ उठवत होता – तिने सगळं त्याच्या इच्छेप्रमाणे करूनही, अगदी मनापासून त्याच्यावर प्रेम करूनही, तिची काही एक चूक नसतांना तिला ही सजा का मिळाली होती? जोपर्यंत तिला याचं उत्तर मिळत नव्हतं किंवा कोणीही काही कारण पटवून देऊ शकत नव्हतं, तोपर्यंत तिचं मन आक्रोशच करत राहात होतं....

म्हणजे याचा अर्थ असाच ना की तिच्या बाजूने काहीही चूक नसतांना तिच्यावर हा अन्याय झाला होता? त्या अन्यायाची दाद ती कोणाकडे मागणार होती? म्युच्युअल कन्सेन्टसाठी कबूल न होता त्याला लढा देऊन ती कोर्टासमोर आपली बाजू मांडू शकली असती, तिथे न्याय मागू शकली असती. पण त्याचा काय फायदा झाला असता? त्यांची केस लांबतच गेली असती; आणि त्यामुळे त्यांच्यातील कडवटपणाही. जेव्हा तो सर्वार्थाने दुसरीचा झालाच होता तेव्हा बळजबरीने त्याला स्वतःशी बांधून ठेवून तिला काय मिळालं असतं? त्यामुळे म्युच्युअल कन्सेन्ट हा एकच पर्याय होता. आणि आता तर सगळच संपलं होतं. मग तिचं हे शरीर का अजून जिवंत होतं? आणि का होता हा रडणारा जीव सतत तिच्या नशीबाला चिकटलेला?

एका रविवारी संध्याकाळी जेव्हा घरचे सगळेच कोणाकडे सत्यनारायणाला गेले असतांना पूजावहिनी तिच्यासमोर येऊन बसली. अमृताला पळ काढायची संधी न देता तिने आपले विचार स्पष्टपणे मांडले, "हे बघ अमृता, तुझे आईवडील इथे आहेत तेव्हा हे तुझं माहेर, तुझंच घर आहे. आम्हीही तुझीच माणसं आहोत आणि तुझ्या परिस्थितीबद्दल पूर्ण सहानुभूतीही आहे. आता हे तुझं

माहेर, तेव्हा तुला इथे राहण्याचा पूर्ण हक्क आहेच. पण तू ही काही गोष्टी लक्षात घेऊन वागायला नको का? या घराची एक नीट बसलेली घडी आहे, इथल्या सर्वांचे चाकोरीतले सुरळित दिनक्रम आहेत. पण आता ---- तुझ्यामुळे....म्हणजे, तुझ्या या वागण्यामुळे, स्वतःच्याच मुलाकडे दुर्लक्ष करण्यामुळे सगळया घराची घडी विस्कळित झाली आहे, सगळं घरच अस्वस्थ झालंय. तुझ्या हे ध्यानात येत असेल ना?"

वहिनीच्या या विचारण्याचा काय अर्थ होता हे तिला कळेना, पण अमृताला उत्तर द्यायचीही इच्छा नव्हती. पूजाच पुढे म्हणाली, "तू का आपल्याच लेकराकडे असं दुर्लक्ष करतेस? सारखा रडत असतो आणि तू साधं उचलतही नाहीस. घरात सगळ्यांनाच ऐकवत नाही म्हणून शेवटी आईच धडपडून त्याला सांभाळतात. पण त्यांच्याच्यानेही आता होत नाही ग. कबूल, माझी मुलं मोठी करण्यात त्यांनी खूप मदत केली, पण मी सर्वकाही त्यांच्यावर पडू दिलं नव्हतं. आता त्या थकल्यात. तुझ्यापुढे बोलून दाखवत नाहीत, उपयोग तरी काय म्हणा? तुझं कुठे लक्ष असतं? पण त्यांच्या सारख्या तब्येतीच्या तक्रारी चालू असतात. तू नुसती एका जागी बसून असतेस, तुझंही करायचं, तुझ्या बाळाचंही ---- आणि अशानं त्या आजारी पडल्या तर तू थोडीच..... ते ही सगळं आम्हीच बघायचं ना? सर्व घराचं स्वास्थ्य बिघडलय. ऑफिसातून थकून घरी यावं तर सतत याचं रडणं. तो तरी काय करणार बिचारा! जन्मदात्रीच जर ढुंकूनही बघेना – बाळाचा गर्भ रूजू देतांना एकदाही तुझ्या मनात हा विचार आला नाही का, की मूल झाल्यावरही जर

नवऱ्याने हे नातं तोडलच तर मग त्या मुलाचं काय? ही सगळी मोहीम आखतांना हा विचार तू केला नाहीस?"

अमृता मनातल्या मनात चरफडली. कोणत्या हळव्या क्षणी कुठून आपल्याला दुर्बुद्धी झाली आणि वहिनीला विश्वासात घेऊन आपण तिच्याकडे मन मोकळं केलं? आता तिचेच शब्द वापरून पूजा तिलाच जखमा देत होती. "अगं, एकटी सडी असतीस तर आपली नोकरी, आपलं आयुष्य. आता.... ते जाऊ दे. इथं राहायचं तर जरूर राहा. पण घरातल्या इतरांचाही विचार कर इतकंच माझं म्हणणं. तुझी तूच स्वतःच्या घरातच राहात असतीस नि तुझ्या वागण्याचा, मुलाचा असा दुस्वास करण्याचा कोणालाही त्रास झाला नसता तर तुला जसं हवं तसंच राहाता आलं असतं. पण इथे सर्वांबरोबर राहायचं तर जरा ध्यान-धोरण ठेवणं आवश्यक आहे......"

वरकरणी काहीच नाही दाखवलं तरी अमृता आतल्याआत दगडासारखी एकदम ताठर झाली. पूजावहिनीने मुद्दामच तिच्या घराची सूचना केली होती हे तिच्या लक्षात आलंच. थोडक्यात काय, तर तुझं सुतक आणि रडणारं पोर घेऊन तुझ्या घरीच जा! अनिषने घर तिच्या नावावर करून दिलं होतं – एकतर घर दोघांच्या नावावर असल्याने त्याला घर हवं असल्यास तिच्या हिश्याचे पैसे द्यावे लागले असते. आणि दुसरं महत्त्वाचं कारण – अमृताच्या असं कानावर आलं होतं की त्याची जी होणारी नियोजिता होती तिने, ज्या घरात पहिलीच्या आठवणी आहेत तिथे जायला नकार दिला होता. त्यामुळे घर आता अमृताचं होतं. पण तिलाही तिथे जायची जराही इच्छा नव्हती.

आई बाहेरून आली तेव्हा तिला घरात काय बोलणी झाली-- बोलणी कसली, फक्त पूजाचं बोलणं—हे कळलंच असणार. पण ती काही बोलली नाही. पूर्ण रात्र अमृता टक्क जागी होती. आधीच विचारांचा कल्लोळ काय कमी होता त्यात पूजावहिनीचे शब्द. तिच्या जीवाची तडफड होत होती.

सकाळी सगळयांची शाळा-ऑफिसला जाण्याची घाई गडबड. अमृता तोवर गप्प बसून राहिली. पण सगळे जाताच बॅग काढून त्यात भराभरा हाती येतील त्या आपल्या वस्तू, कपडे भरू लागली. आई तर धास्तावलीच. "अगं....अगं, हे काय करतेस? असं अचानक? एवढी का घाई.... अगं, ती बोलली असेल, पण तू एवढी डोक्यात राख घालून घेऊ नकोस...."

"हो, मी आहेच डोकेफिरू .... आहे ना? मग जाऊ दे ना मला, मी गेलेलीच बरी ना...." अमृता जवळजवळ ओरडलीच.

"अगं, असा आततायीपणा नको करूस. जायचं तर जा, पण सावकाशीनं.....थोडे दिवस मुलाचं सगळं स्वतःहून करायची सवय तर करून घे, मग हवं तर जा. नाही तर सांभाळशील कशी त्याला?" आई काळजीने म्हणाली.

"मी सांभाळीन नाही तर त्याला गॅलरीतून फेकून देईन. तुम्हा लोकांना काय त्याचं?" अमृता धुसफुसली.

"असं नको बोलूस ग..." आईच्या डोळयात पाणी आले, "तू अश्या मनःस्थितीत गेलीस तर काळजीनं माझा जीव अर्धा होईल.... ऐक माझं..."

पण अमृता ऐकायला तयार नव्हती. बॅगा भरल्या आणि पोराला बकोटीला मारून ती निघाली. न राहवून शेवटी बाबा मध्ये पडले. अमृताला बाबांचा थोडा धाकही होता, खूपशी मायाहीहोती; त्यांना ती वावगं बोलू शकत नव्हती. ती जिना उतरतांना ते जेव्हा तिच्या पाठी धावले, तेव्हा ती खोल श्वास घेऊन म्हणाली, "घाबरू नका बाबा, तेवढा तोल गेला नाहीए अजून माझा...... काही विपरित घडणार नाही...."

सोसायटीच्या वॉचमनकरवी सामान खाली आणवलं, तोवर बोलावलेली टॅक्सी आलीच आणि अमृता आपल्या घरच्या रस्त्याला लागली. ते घर, जे तिचं आणि अनिषचं घरटं होतं. आता? पण तिने का तिथल्या आठवणींना भ्यावं? तिने तर काही चूक केली नव्हती –

पण आता ते सगळं बाजूला ठेवून दैनंदिन व्यवहाराचं बघण अपरिहार्य होतं. दार उघडताच तिचं अंग शहारलं – नको होतं तिला हे सारं ..... बंद हवेचा एक जुनाट वास भरून राहिला होता. तिने खिडक्या उघडल्या नि पोराचं मुटकुळं पलंगावर टाकत बडबडली, "आता रड गळा काढून हवा तितका. इकडे कोणी येणार नाही तुझं रडणं ऐकायला आणि कोणाला त्रास होणार नाही तुझ्या रडण्याचा. तेव्हा रड --- रड---"

अमृताने कपडे बदलले आणि बाथरूममध्ये जाऊन खसखसून हातपाय धुतले. तोंड टॉवेलने पुसत ती बेडरूममध्ये आली आणि पलंगाकडे पाहतांना तिचं काळीज क्षणभर हलल – तिला तिथे मुसमुसणाऱ्या बाळाच्या जागी तीन-एक

वर्षाआधीची, आयुष्यात वादळाने प्रवेश करण्यापूर्वीची, अमृता दिसली – मांडीवर उशी ठेवून तिला बाळासारखं थोपटत हसत-लाजत बोलणारी, "अनिष, आता फार नाही हं थांबायचं, मला खूप आवड आहे मुलांची आणि आता तसे आर्थिकदृष्ट्या स्थिरावलोय आपण.... मी तर ना, बाळाच्या जन्मानंतर कमीत कमी एक वर्ष तरी नाही जाणार कामावर. क्लेम ठेवून जितकी मोठी गॅप घेता येईल तितकी घेणार. कसं सोडून जाववेल? मी नाही ....."

आणि आता? मूल तर तेच होतं, तिच्या स्वप्नांतलं – तिचं आणि अनिषचं. मग तिची माया कुठे गेली होती? त्याचं ते घुसमटल्यासारखं रडणं पाहून ती जागच्याजागी गोठली. अचानक कसली तरी जाणीव झाली – मला काय अधिकार आहे अशी फिर्याद करण्याचा की माझा काहीही दोष नसतांना मला का सजा? जेव्हा मी स्वतः तसाच अत्याचार माझ्या स्वतःच्या मुलावर करत आहे, तर मला काय हक्क आहे दाद मागण्याचा?

मी निदान आक्रोश तरी करू शकते, जगाकडे तक्रार करू शकते की मी काही चूक केली नसतांना मला जन्मभराची शिक्षा मिळाली. पण हे इवलंसं पोर तर कोणाला सांगूही शकत नाही की माझी काहीही चूक नसतांना माझी जन्मदात्री आईच माझ्यावर असा जुलूम करते आहे. आपल्याला स्वतःचं दुःख जाणवलं, आपल्यावर झालेला अन्यायच आपण उगाळत बसलो. आणि तसाच अन्याय आपण आपल्याच उदरात वाढलेल्या निष्पाप जीवावर करत राहिलो – त्याने न केलेल्या गुन्ह्याची सजा त्याला देत राहिलो.

तिने पुढे होऊन पट्कन त्याला उचलून घेतं, आपल्या छातीशी कवटाळलं. आता ती हमसून हमसून रडत होती --- आणि आश्चर्य म्हणजे, बाळ शांत झाला होता. इतक्या धसमुसळेपणाने, श्वास गुदमरेल इतकं घट्ट आवळूनही -----. कदाचित त्या स्पर्शात बाळाला कुठेतरू जाणवलं की आपले रडण्याचे दिवस संपले, आपण सुरक्षित आहोत. अमृता बाळाला कवेत भरून रडत राहिली आणि तो शांतपणे तिच्या ओढणीचं टोक मुठीत धरून चोखत राहिला .........

---

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ्रंट फुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट. कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.